# Trends in Commerce, Economics & Life Sciencess

**Chief Editor**

**Dr. B. M. Dhoot**

**Dr. S.V. Kshirsagar**

**Co-Editor**

**Dr. S.B. Donge**

**Dr. G.A. Bhurke**

**Dr. S.U. Kalme**

ISBN No. 978-93-83995-60-9
Anuradha Publications, Nanded

# Trends in Commerce, Economics & Life Sciencess

**Chief Editor**
Dr. B. M. Dhoot
Dr. S.V. Kshirsagar

**Co-Editor**
Dr. S.B. Donge
Dr. G.A. Bhurke
Dr. S.U. Kalme

**ISBN No.** 978-93-83995-60-9

**Published by:**
Anuradha Publications
Cidco-Nanded

**Publication Year:** 2021-22

**Price-** Rs. 190/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**
Gurukrupa Offset,
Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**
Simran Computers
Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**
Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS


| Sr. No. | Content |
|---|---|
| 01 | Black Money and its Disastrous Influence on Indian Economy |
| 02 | Obstacles and the Importance of Commerce Education |
| 03 | To Study the Leaf Extract of Some Medicinal Wild Plants on Growth of Macrophomina Phaseolina (Tassigoid) Causing Root Rot Disease of Sapgandha |
| 04 | A Review of New Challenges in Internet Banking and Its Benefit |
| 05 | Studies on Growth of Macrophomina phaseolina isolated from infected roots of Sarpagandha on Selected Media |
| 06 | Applications and Challenges of Nanotechnology |
| 07 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०: उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा |
| 08 | Studies on root rot of Rauwolfia serpentina L. Benth ex Kurz caused by Macrophomina Phaseolina (Tassi) Goid |
| 09 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार |
| 10 | Commerce Education: Challenges and Solutions |
| 11 | Studies on Rauwolfia tetraphylla Benth. Ex. Kurz. (Sarpaghandha) |


कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार

**डॉ.सतीष डोंगे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड जि.परभणी

**प्रस्तावना:**

भारताच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय इतिहासाला ज्या थोर महापुरुषांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने तसेच विचारांनी नवी दिशा दिली त्या महान नेत्यांमध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.त्यांचे व्यक्तिमत्व हे अनेक वैचारिक अंगांनी पुढारलेले होते. ते एक भारतरत्न,दलितांचे कैवारी, घटना तज्ञ, मानववंश शास्त्रज्ञ,प्रख्यात कायदेतज्ञ,संसदपटू,संपादन आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशा अनेक पैलूंनी ओळखले जात असले तरी एक जागतिक दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. डॉक्टर बाबासाहेबांच्या दैदिप्यमान कार्याचा व बुलंद व्यक्तिमत्वाचा परिचय करून देणे अर्थशास्त्राच्या अभ्यासकापुढे आव्हान आहे..भारताच्या क्षितिजावर डॉक्टर बाबासाहेब यांनी आपल्या बुद्धिमत्तेने ,जुन्या विषमता ग्रस्त व कालबाह्य व्यवस्थेला ठोकर मारून भारताला नवी दिशा तर दिली त्याच बरोबर अस्पृश्य समाजाला व समाजातील प्रत्येक व्यक्तीला सर्व क्षेत्रात समता,स्वातंत्र्य,बंधुता व न्याय यावर आधारित व्यवस्था देखील प्रदान केली.

१४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चीपळून येथे खोती परिषद आयोजित करण्यात आली या परिषदेचे अध्यक्ष म्हणून बोलताना डॉक्टर आंबेडकर म्हणतात... 'मला असे वाटते की माझा जन्म सर्वसाधारण जनतेची जबाबदारी घेण्यासाठीच असावा मी अत्यंत हीन मानलेल्या समाजात जन्म झाल्यामुळे त्या समाजासाठी जीवापाड मेहनत करणे मला भाग पडले आहे तसेच अस्पृश्य कामगारांना व इतर कामगारांना हक्क मिळवून देणे माझे कार्य आहे.'

**स्वतंत्र मजूर पक्ष :**

डॉ बाबसाहेब यांच्या मते जगात दोनच वर्ग आहेत ते म्हणजे पिळणारे व पिळले जाणारे.मजूर चळवळीविषयी त्यांच्या सखोल चिंतनाचा परिचय त्यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या कारकिर्दीत होतो.१५ ऑगस्ट १९६८ रोजी या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.शेतकरी, कामगार वर्ग, गरीब बेरोजगार यांच्या हिताचे काळजी घेण्याचे कार्य या पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट होते. तसेच पददलित, गोरगरीब अशा श्रमजीवी वर्गाचे हितरक्षण व संवर्धन करणे हेच या पक्षाचे प्रमुख कार्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनाची उत्कर्षबिंदू त्यांच्या लिखाणातून आढळतो. त्यांनी स्वतंत्र कामगार विषय हक्कासाठी झटून आर्थिक प्रश्नांची सोडवणूक

ISBN No. 978-93-83995-60-9
Anuradha Publications, Nanded

केली. त्यांच्या कामगार चळवळीतून कामगार वर्गाला आणि त्यांच्या भावी पिढीला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांचे श्रम विषयक धोरण व अर्थशास्त्र विचार भारताला चिरंतर विकासाकडे घेऊन जाणारे आहेत.

आंबेडकरांच्या मते सामान्य मनुष्याला आपल्या आवडीनुसार आपला उत्कर्ष करण्यास संधी आणि स्वातंत्र्य देईल असे सामाजिक आणि आर्थिक समता आवश्यक आहे. तसेच जर उत्पादनाची साधने थोड्या व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी वापरत आहे, तोपर्यंत सामान्य माणसाला त्याच्या उत्कर्षाची आशा नसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतकरी, कामगार आणि भूमिहीन यांचे एक प्रभावी पुढारी होते. १९३८ च्या १२ आणि १३ फेब्रुवारीला मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगारांची एक मोठी परिषद भरली होती २० हजार कामगार त्या परिषदेस हजर होते. त्यावेळी आपल्या भाषणात ते म्हणाले "कुमारावस्थेत मी आपल्या नातलगांच्या जेवणाचे डबे पोहोचवण्याचे काम केलेले असल्याने कामगारांच्या प्रश्नाविषयी मला निकटची माहिती आहे. आपण कामगार म्हणून जन्मलो आहोत." सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी व आर्थिक अडचण दूर करण्यासाठी लढा दिलेला आहे. त्यांच्यामते जोपर्यंत तत्वाच्या दृष्टीने धडधडीत अन्याय आणि संघटनेच्या दृष्टीने एकजुटीला अपायकारक असलेला हा अन्याय, पक्षपात दूर होत नाही तोपर्यंत कामगार एकजूट कशी निर्माण होईल असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते.

त्यांच्यामते मनुष्याला इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडणे म्हणजे त्याला गुलाम बनवणे होय. संप म्हणजे कामगारांचा आपण कोणत्या अटीवर नोकरी करण्यास तयार आहोत हे सांगण्याचे स्वातंत्र्य असलेला हक्क होय. कामगारांना संप करण्याचा सुद्धा हक्क आहे असे मत त्यांनी मांडले. सरकार बद्दलचे मत व्यक्त करतांना ते म्हणतात की जे सरकार आपण कामगारांच्या मतांवर निवडून आलो असा दावा सांगते त्या सरकारने कामगारांना दिलेल्या आश्वासनांना जागले पाहिजे.

**कामगार विषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कोणत्याही समाजात त्या देशातील सर्वसामान्य जनतेच्या जीवन मार्गात कामगार व मालक वर्ग यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते आणि अशी असमानता म्हणजेच अंतिमतः त्या अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासात अडथळा ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इम्प्रुव्हमेंट चाळीत राहत असताना त्यांना कामगारांची जीवन जवळून बघता आले कामगारांचे होणाऱ्या शोषणाबाबत ते अधिक गंभीर झाले होते. वेगवेगळ्या उद्योगातील कामगार चळवळीचे नेतृत्व त्यांनी केले होते. कामगारांचे शोषण संपवावे त्यांची संघटना असावी याबाबत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. कामगारांनी राजकीय सत्ता हाती घेतली तर कामगार हिताची कायदे करता येतील असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकर मजूर मंत्री असताना कामगार हिताचे अनेक निर्णय घेऊन त्यांनी अंमलबजावणी केल्याचे दिसून येते. तसेच विमा संरक्षण या बाबींची अंमलबजावणी करण्यात पुढाकार घेतला. डिसेंबर १९४३ रोजी डॉ. आंबेडकरांनी खाणीला भेट दिली असता एक गरोदर स्त्री खाणीत काम करताना त्यांना दिसून आली त्यावेळी त्यांनी गरोदर स्त्री कामगारांना खाणीत पाठवू नये. त्यांना अन्य कामे द्यावीत. प्रसूतीपूर्वी व प्रसूतीनंतर त्यांना पगारी रजा द्यावी या संदर्भात अंमलबजावणी करून नंतर त्यांचे कायद्यामध्ये रूपांतर केले.सामाजिक सुरक्षिततेचे संबंधीच्या तरतुदी,आजारपणाचा विमा,नुकसान भरपाई,प्रसूती संबंधी नियम,खाणीवर स्नानगृह आदींची तरतूद करण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. रोजगार विनिमय केंद्राची स्थापना आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे झालेली दिसते.कुशल कामगारांच्या भरतीसाठी कार्यालय सुरू करण्यात आली आहे. कामगारांना रोजगाराची माहिती मिळावी व रोजगार मिळवण्यासाठीची सोय उपलब्ध व्हावी या हेतूने सेवायोजन कार्यालयाची निर्मिती करण्याचा हेतू होता.

इ.स.१९४२ ते १९४६ या दरम्यानच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असल्याने त्यांच्याकडे श्रमविभागाचा प्रभार होता. २७ नोव्हेंबर १९४२ मध्ये त्यांनी बारा तासांची कामाची वेळ बदलून आठ तासांची केले. नवी दिल्ली येथे त्रिपक्षीय कामगार परिषद बोलवली होती. त्यामध्ये औद्योगिक कामगार आणि कामगारांच्या समस्यांबद्दल सरकार आणि निधीमध्ये कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून मूलभूत बदल केले होते.भारतीय महिला कामगारांसाठी मातृत्व लाभ कायदा, महिला कामगार कल्याण, समान वेतन यासारखे अनेक कायदे त्यांनी केले ८ नोव्हेंबर १९४३ रोजी कामगारांसाठी कामगार संघटना कायदा लागू करण्यात आला.कामगारांना वैद्यकीय सेवा,वैद्यकीय रजा,शारीरिक इजा झाल्यास नुकसानभरपाई देण्यात यावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले.कर्मचाऱ्यांसाठी विमा कायदा त्यांनी अस्तित्वात आणला. पूर्व आशियाई देशांमध्ये भारत हे पहिले राष्ट्र होते.

**निष्कर्ष:**

१ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून ओळखला जातो. कामगारांना कामाच्या ठिकाणी विविध हक्क, लाभ मिळाले ते बाबासाहेब आंबेडकरांमुळे याकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यांनी विविध कायदे करून कामगारांच्या हितासाठी प्रयत्न केले आहे. महिला व बालकामगार, कोळसा खाणीतील कामगार यांना संरक्षण मिळण्यासाठी अनेक कायदे केले आहेत.आधुनिक काळात कामगारांची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी तसेच महिलांना नोकरी चांगल्याप्रकारे करता यावी यासाठी आरोग्यसेवा आणि प्रसूती रजेची तरतूदही त्यांनी केली कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या आहेत.

डॉ. बाबासाहेबांचे विचारामुळे आज आपण एकविसाव्या शतकामध्ये काही प्रमाणात का होईना गरीब-श्रीमंत, उच्च-नीचता, सामाजिक विषमता कमी झाल्याचे दिसून येते. कामगारांच्या शक्तीचा पुरेपूर वापर केला जात आहे. त्यामुळे देशाच्या उत्पादकतेमध्ये वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सुद्धा वाढ झाल्याची दिसून येते. तसेच स्त्री-पुरुष हा भेदभाव कमी झाल्याने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये महिला कर्मचारी काम करताना आपल्याला दिसून येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार विषयक जे कायदे केलेले आहेत त्या कायद्यांची अंमलबजावणी झालेली असल्यामुळे काही प्रमाणात कामगारांवर वेगळ्या प्रकारचे अत्याचार कमी झाल्याचे आपल्याला दिसून येते. महिलावर्ग सुद्धा वेगळ्या कौटुंबिक जबाबदारी सांभाळून विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडू लागलेल्या आहेत या सर्वांचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते. उत्पादनाच्या प्रक्रियांमध्ये भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक या चारी घटकांना महत्त्वाचे स्थान असते. उत्पादन घटकांमध्ये सजीव आणि सक्रिय घटक हा श्रम मानला जातो मजूर मंत्री असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण केले. त्यांच्या कामाची सुरक्षितता, गरजा, शिक्षण त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची सोय याबाबत महत्त्वाचे निर्णय घेऊन कामगार हिताचे ठरवले. त्यामुळे आज असे वाटते की कामगारांना मिळणाऱ्या सोयी, सवलती, सुरक्षितता यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले नियम व कायदे आजही महत्त्वाचे आहेत. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्तमान काळात सुद्धा विचार किती मौलिक व मार्गदर्शक आहेत हे यामधून स्पष्ट होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार हे आजही आपल्याला दिशादर्शक ठरतात.

**संदर्भ:**


- धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई
- अर्थसंवाद एप्रिल जून 2016 खंड 40 अंक
- वसंत मनु, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया
- कविमंडन विजय, डॉक्टर आंबेडकर आर्थिक चिंतन, श्री मंगेश प्रकाशन नागपूर
- https://drambedkarbooks.file
- https://www.कुओर.com
- https://m.facebook.com /notes


******